# उपनिबंधक, सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग, मुंबई यांचे कार्यालय

३०३, अे विंग, ३ रा मजला, बी.एम.सी.गोडाऊन इमारत, संस्कृती कॉम्प्लेक्स जवळ, ठाकूर कॉम्प्लेक्स,
९० फुट रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अे) अन्वये आदेश

जा.क्र.मुंबई/उपनि/ आर दक्षिण / ८९० /२०१८
दिनांक - १९/०३/२०१८

वाचावे : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) मधील तरतूद.
२. संस्थेचे संचालक श्री.गोपालन ए.सी.यांचेकडील दिनांक १०/०१/२०१७ रोजीचे पत्र.
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दिनांक ०९.०२.२०१७ रोजीची नोटीस.
४. श्रीमती रंजना विश्वकर्मा यांचेकडील दि.०२.०४.२०१७ रोजीचे राजीनामा पत्र
५. संस्थेच्या वतीने डॉ. अशोक & असोसिएट यांचेकडील दि. १५.०४.२०१७ रोजीचा खुलासा
६. श्री ए सी गोपालन यांचेकडील दिनांक १७.०४.२०१७ रोजीचे पत्र.
७. मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडील अपिल क्र.१०५/२०१७ दि.१०.८.१७ रोजीचे आदेश.
८. या कार्यालयाकडील दि.०६.०९.२०१७ ची सुनावणी नोटीस
९. संस्थेकडील दि.०६.०२.२०१८ रोजीचा खुलासा
१०. तक्रारदार यांच्याकडील दि.२९.०१.२०१८ रोजीचा खुलासा.
११. श्री.गोपालन ए.सी.यांचेकडील २२.०९.२०१७, १४.१०.२०१७ व ३०.११.२०१७ रोजीचा खुलासा.

ज्याअर्थी, नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१. संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ अन्वये नोंदविण्यांत आलेली असून तिचा नोंदणी क्र.MUM/WR/HSG/TC/1358 सन २००६ दिनांक 22/05/2006 असा आहे. आणि,

ज्याअर्थी नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१. (यापुढे संस्था असे वाचावे) या संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (यापुढे अधिनियम असे वाचावे), महाराष्ट्र सहकारी संस्थांचे नियम १९६१ (यापुढे नियम असे वाचावे), व संस्थेच्या नोंदणीकृत उपविधी व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकामधील तरतूदीस अनुसरुन कामकाज करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, वरील संस्था बृहन्मुंबईच्या आर दक्षिण विभागात कार्यरत असल्याने त्या संस्थेचे निबंधक, उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई हे आहेत आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समितीची निवडणुक दिनांक ०९/०५/२०१५ रोजी झालेली असुन समितीचे गटन तसेच पदाधिकारी यांची निवड झालेली आहे. सदर निवडणुकीमध्ये १३ समिती सदस्य निवडुन आलेले असल्याचे दिसुन येते आणि,

ज्याअर्थी, संस्थेच्या व्यवस्थापक समिती सदस्यांची संख्या १५ असून त्यापैकी २ जागा रिक्त तसेच ७ सदस्यांनी (श्री.जी.पी.पाटील यांनी दिनांक १७.०१.२०१६, श्री. बेलापूरकर वैभव किशोर, श्री. अवस्थी पवनकुमार यांनी दिनाक ०३/१०/२०१६, श्री सुजॉय दत्ता, श्री. [illegible] समीर दत्ताराम, श्री. गोपालन ए.सी, श्री चांद रैना. ) यांनी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे संस्थेचे कामकाज ठप्प झालेले आहे आणि,

ज्याअर्थी, एकुण १५ पैकी कार्यरत १३ समिती सदस्यांपैंकी ७ समिती सदस्यांनी पदाचे राजीनामे दिलेले असल्यामुळे समितीचे गणपूर्ती पुर्ण होत नसल्यामुळे व संस्थेचे कामकाज ठप्प झालेले असल्यामुळे संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकाऱ्यांचे मंडळ नियुक्त करण्याबाबत संदर्भ क्र.२ च्या पत्राने या कार्यालयाकडे विनंती केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, वर नमुद केलेली परिस्थिती विचारात घेता आणि सदर राजीनाम्यामुळे, तसेच रिक्त जागेमुळे व्यवस्थापक समितीची गणपुर्ती (Quoram) पुर्ण होत नसुन संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत आहे. तसेच राजीनाम्यामुळे/रिक्त जागेमुळे संस्थेच्या समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे किंवा समितीने कार्य करण्याचे बंद केले आहे व व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) दि.२६.०४.२०१७ च्या आदेशान्वये संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी श्रीमती नजमा पटेल यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे सदर आदेशास संस्था पदाधिकारी यांनी मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांच्याकडे अपिल क्र.१०५/२०१७ अन्वये अपिल दाखल केलेले होते. कलम ७७ (ए) दि.२६.०४.२०१७ चे आदेश set-aside करुन पुन्हा सुनावणी घेवून कायदयातील तरतूदीनुसार निर्णय घेण्याबाबातचे मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी दि.१०.०८.२०१७ च्या अन्वये आदेश पारीत केलेले आहेत. आणि,

Scanned by CamScanner

त्याअर्थी वर नमुद परिस्थती विचारात घेता, या कार्यालयाने निर्गमित केलेले दिनांक २६.०४.२०१७ रोजीचे आदेशाच्या अनुषंगाने मा. विभागीय सहनिबधक सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई यांच्याकडील दिनांक १०.०८.२०१७ रोजीच्या पारीत केलेल्या आदशाच्या अनुषंगाने फेर सुनावणी घेण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान प्राप्त झालेले लेखी व तोंडी म्हणणे विचारात घेता संस्थेचे कामकाज साक्षेपाने पार पाडता येणार नाही ही वस्तुस्थिती निदर्शनास येत असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेची आवश्यकता असल्याने मी खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ (१)(बी) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डॉ. अविनाश भागवत, उपनिबंधक, सहकारी संस्था,आर/दक्षिण विभाग, मुंबई याद्वारे नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१ या संस्थेच्या संदर्भात दिनांक २६.०४.२०१७ रोजी निर्गमित केलेला आदेश कायम करण्यात येत आहे. सबब संस्थेचे विद्यमान व्यवस्थापक समिती निष्प्रभावीत करुन संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहणेसाठी श्री हनुमंत पवार, प्रमाणीत लेखापरीक्षक याची प्राधिकृत मंडळ म्हणून नियुक्त करीत आहे.

सदरचा आदेश आज दि. १९/०३/२०१८ रोजी माझी सही व या कार्यालयाच्या मुद्रेसह दिला असे.

सही/-
(डॉ. अविनाश भागवत),
उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

प्रति,
श्री हनुमंत पवार, प्रमाणीत लेखापरीक्षक
यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या माजी पदाधिकारी यांचेकडून दप्तराचा ताबा त्वरीत घेऊन तसा अहवाल या कार्यालयात अवगत करावा.

प्रति,
१. माजी.अध्यक्ष / सचिव/खजीनदार,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई -४०० १०१
यांना कळविण्यात येते की, नवनियुक्त प्राधिकृत मंडळ यांना संस्थेचा संपुर्ण दप्तराचा ताबा त्वरीत देऊन तसा अहवाल या कार्यालयात अवगत करावा.

१. अध्यक्ष / सचिव,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई -४०० १०१.
२. श्री. अवस्थी पवन कुमार,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.
३. श्री. कदम दिपक रघुनाथ,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.
४. श्री. कनवर अशोक कुमार करमचंद,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.
५. श्री. कटारीया अनिल कुमार,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

Scanned by CamScanner

६ श्री. अथाले चिंतामणी,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

७. श्री. बेलापुरकर वैभव किशोर,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

८. श्री. दत्ता सुजॉय,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१.

९ श्री.चंद्र रायना क्रिष्णा,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१.

१०. श्री. सेरावत समीर दत्ताराम,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१.

११. श्री. गोपालन ए.सी,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१.

१२. श्री.जी.पी.पाटील,
नेबरहूड को.ऑप.हौ.सो.लि., लोखंडवाला टी/शिप,
आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई - १०१.

२/- यांना कळविणेत येते की, संस्थेच्या सपुर्ण दप्तराचा ताबा निवनियुक्त प्राधिकृत मंडळ यांच्याकडे सुपुर्द करुन तसा अहवाल सादर करावा तसेच सदर नियुक्तीच्या आदेशापासून संस्था पदाधिकारी यांच्या कोणताही आर्थिक बाबी संदर्भात बँक व्यवहार करण्यात येऊ नये. अन्यथा याबाबतची सर्वस्वी जबाबदारी सबंधितांची राहील याची कृपया गंभीर नोंद घ्यावी.

१३) मा.अध्यक्ष/सचिव, व्यवस्थापक, मुंबई जिल्हा गृहनिर्माण सहकारी संस्थाचा संघ,विकास प्रिमायसेस ,फोर्ट मुंबई- ०१

१४) चेअरमन/व्यवस्थापक, दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कांदीवली , कॉर्पोरेशन बँक लोखंडवाला टाऊनशिप, कांदिवली पुर्व-१०१

२/- यांना कळविण्यात येते की, सदर संस्थेच्या खात्यावरील विदड्रावलचे व्यवहार नवनियुक्त प्राधिकृत मंडळ यांच्या मान्यतेशिवाय करण्यात येऊ नये.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१.मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे
२.मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था मुंबई विभाग मुंबई
३.मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४) मुंबई
४.निवड नस्ती.

उपनिबंधक,
सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई

Scanned by CamScanner